SHIVNERI COLLEGE
SHIRUR ANANTPAL

क्र. एनजीसी २०००/नमवि/(१/२०००)/मशि १,
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २८ जून, २०००

प्रति,
कुलसचिव,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
नांदेड

विषय : सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षापासून नवीन महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी देणेबाबत.....

संदर्भ : संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचे पत्र क्र. मविविमं/नमप्र/१९९९-२०००/ १६२५९-३६१, दिनांक ३०.१२.१९९९

महोदय,

सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षापासून नवीन महाविद्यालये सुरु करण्यासंदर्भात आपल्या विद्यापीठाकडून शासनास प्राप्त झालेल्या शिफारशींचा विचार करुन, महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ च्या कलम ८२ (५) नुसार खाली नमूद केलेल्या संस्थेला त्या समोर दर्शविलेल्या ठिकाणी व दर्शविलेल्या विद्याशाखेचे नवीन महाविद्यालय सुरु करण्यास सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षापासून पुढील अटींच्या अधिन राहून शासनाची परवानगी देण्यात येत आहे.

| संस्थेचे नाव | ठिकाण | विद्याशाखा |
|---|---|---|
| गुरु विश्वंभरकृपा बहुउद्देशिय शिक्षण प्रसारक मंडळ, लक्कडजवळगा, ता. शिरुर अनंतपाळ, जि. लातूर | शिरुर अनंतपाळ, जि. लातूर | कला |

० सदर महाविद्यालयास देण्यात आलेली परवानगी सध्या विना अनुदान तत्वावर असून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणा-या अनुदान संदर्भातील शासन निर्णयाच्या अटींच्या अधिन राहून या महाविद्यालयास अनुदान तत्वावर आणण्याचा यथावकाश विचार करण्यात येईल.

(कृपया मागे पहा)

PRINCIPAL

• या महाविद्यालयास जी विद्याशाखा सुरु करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे, त्या विद्याशाखेच्या त्रिवर्षीय पदवी परीक्षेच्या पहिल्या वर्षाच्या वर्गात खाली दर्शविल्याप्रमाणे विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला तरच वर्ग सन २०००-२००१ पासून सुरु करावा.

अ) शहरी विभाग ६०

ब) आदिवासी विभाग ४०

क) ग्रामीण विभाग ५०

ड) महिला महाविद्यालय ५०

• तसेच, सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षाच्या शेवटी होणा-या प्रथम वर्षाच्या विद्यापीठ परीक्षेत कमीत कमी खालीलप्रमाणे विद्यार्थी बसणे आवश्यक आहे. :-

अ) शहरी विभाग ५०

ब) आदिवासी विभाग ३०

क) ग्रामीण विभाग ४०

ड) महिला महाविद्यालय ४०

२. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ च्या कलम ८३ मधील तरतुदीनुसार संलग्नीकरण करण्याबाबत योग्य ती कार्यवाही विद्यापीठाने तात्काळ करावी व पूर्तता अहवाल संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांना अग्रेषित करावा.

तसेच ज्या संस्थेस ज्या ठिकाणी नवीन महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे, त्या ठिकाणी अन्य संस्थांचे प्रस्ताव असल्यास ते अमान्य करण्यात आले असल्याचे विद्यापीठ स्तरावरुन संबंधित संस्थांना कळविण्यात यावे.

आपला विश्वासू,

(म. अ. सरपोतदार)

सहसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत -

शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.

विभागीय सह संचालक (उ.शि.), नांदेड

अध्यक्ष/सचिव, गुरु विश्वंभरकृपा बहुउद्देशिय शिक्षण प्र... मंडळ, लक्कडजवळगा,

ता. शिरुर अनंतपाळ, जि. लातूर

प्रधान सचिव, मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

खाजगी सचिव, मा. उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई

खाजगी सचिव, मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई

खाजगी सचिव, राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई

स्वीय सहाय्यक (प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण)

निवड नस्ती मशि-३.

PRINCIPAL
Shivneri Mahavidyalaya
(Arts, Commerce & Science)
Shirur Anantpal Dist. Latur (M.S.)

PRINCIPAL